



दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार ६ एप्रिल २०२५ | अंक ११५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



# कर्जमाफीच्या पैशाचं काय करता? साखरपुडे, लग्न?

## कर्जमाफीबद्दल विचारताच माणिकराव कोकाटेंनी शेतकऱ्याला सुनावलं!

### मग त्यातून साखरपुडे करा, लग्न करा

तसेच आता सरकार तुम्हाला (शेतकऱ्यांना) शेतीमध्ये गुंतवण्यासाठी पैसे देणार आहे. तुम्हाला पाईपलाईनाला पैसे आहेत. सिंचनासाठी पैसे आहेत. तुम्हाला शेततळ्यासाठी पैसे आहेत. सरकार भांडवली गुंतवणूक करतं. भांडवली गुंतवणूक शेतकरी करतात का? शेतकरी म्हणतात की, पीक विम्याचे पैसे पाहिजेत. मग त्यातून साखरपुडे करा, लग्न करा,'' असं विधान माणिकराव कोकाटे यांनी केलं.

### त्या पैशांचं तुम्ही काय करता?

शेतकऱ्याच्या या प्रश्नाचे उत्तर देताना कोकाटे म्हणाले की, “जे नियमितपणे कर्ज भरतात त्यांनी भरावं. कर्ज घ्यायचं आणि पाच ते दहा वर्ष कर्जमाफी होण्याची वाट पाहायची. तोपर्यंत काही भरायचं नाही. समोर मीडिया उभी आहे. त्यामुळे मीडियासमोर मी जास्त बोलत नाही. पण मला एक सांगा, कर्जमाफी झाल्यानंतर तुम्हाला पैसे येतात. त्या पैशांचं तुम्ही काय करता? त्या पैशांतून शेतीमध्ये एक रुपयाचीतरी गुंतवणूक आहे का?” असा सवाल त्यांनी केला.

कर्जमाफीबाबत विचारताच कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्याला सुनावलं आहे. पाच-दहा वर्ष कर्जमाफीची वाट पाहता. तोपर्यंत कर्ज भरत नाही, असं कोकाटे यांनी म्हटलंय. तसंच कर्जमाफीच्या पैशातून लग्न, साखरपुडा करता असंही ते शेतकऱ्याला उद्देशून म्हणाले आहेत. माणिकराव कोकाटे हे नाशिकच्या दौऱ्यावर होते. अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या पिकाची पाहणी करण्यासाठी ते नाशिकमध्ये गेले होते. शेतकऱ्याने विचारला प्रश्न माणिकराव कोकाटे हे अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर गेले होते. तेथे त्यांनी अवकाळीमुळे खराब झालेल्या द्राक्ष पिकाची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्याने माणिकराव कोकाटे यांना शेतकरी कर्जमाफीबाबत विचारलं. ‘अजितदादा बोलले की कर्जमाफी होणार नाही, रेग्यूलर कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळेल का?’ असं शेतकरी कोकाटे यांना उद्देशून म्हणाला. त्यामुळे पुढील काळात अशा घटना घडू नये, यासाठी अतिशय कडक कारवाई करण्यात येणार असल्याचं फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## बाबूशेट लोढा यांचा सत्कार सोहळा



चौसाळा येथील ग्रामपंचायत कार्यालयास राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ मासाहेब यांचे वंशज शिवाजी राजे जाधव यांनी भेट दिली यावेळी चौसाळा शहराचे सरपंच श्री प्रेमचंद उर्फ बाबू शेठ लोढा यांची बीड जिल्हा जैन समाजाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शिवाजी राजे जाधव व बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने शाल,श्रीफळ, पुष्पगुच्छ व माँसाहेब जिजाऊ यांची प्रतिमा भेट देऊन सत्कारित करण्यात आले. तसेच राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचे वंशज शिवाजी राजे जाधव यांचा चौसाळा ग्रामपंचायत च्या वतीने सरपंच प्रेमचंद उर्फ बाबू शेठ लोढा यांनी चौसाळा ग्रामपंचायतला भेट दिल्याबद्दल सत्कार करण्यात आला यावेळी ठाकरे गटाचे बीड लोकसभा संघटक युवा नेते श्री नितीन भैया धांडे यांचा सत्कार चौसाळा ग्रामपंचायत च्या वतीने करण्यात आला तसेच मराठा सेवा संघाचे चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला यावेळी विविध विषयावर शिवाजी राजे जाधव व सरपंच लोढा , नितीन भैया धांडे यांच्यामध्ये चर्चा झाली .यावेळी चेअरमन दत्तात्रय नाईकवाडे श्रीमंत नाईकवाडे, उमेश जोगदंड, चौसाळा पत्रकार संघटनेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य विकास नाईकवाडे ग्रामपंचायत सदस्य किशोर ढोकणे, सुरज सोनवणे ग्रामपंचायत कर्मचारी प्रदीप पवार ईसाक भाई बाजीराव नाईकवाडे उपस्थित होत

## राज्याच्या गृहराज्यमंत्र्याचा मोबाईल मिसिंग की बीडच्या गुन्हेगारांनी मंत्र्याला ट्रायल दाखवली

### सामान्य जनतेने न्यायाची अपेक्षा कोणाकडे करायची- उल्हास गिराम

बीड : (प्रतिनिधी ) महाराष्ट्राज्यचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचा काल मोबाईल गहाळ झाल्याची माहिती आज मिळाली. मोबाईल गहाळ झाला की योगेश कदम यांना बीडच्यागुन्हेगारांनी ट्रायल दाखवली, समोर मीडिया उपस्थित असतांना मोबाईल गहाळ होतो, केज पोलीस स्टेशनला तशी मिसिंग तक्रार संबंधित मंत्र्याने दिली आहे असे समझले. जर राज्याचा गृहराज्य मंत्रीही बीड मध्ये असुरक्षित असेल तर जिल्ह्यातील जनतेने न्यायाची अपेक्षा कोणाकडे करायची, असा उपरोधीक टोला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम



यांनी गृहराज्यमंत्र्याला लागवाला आहे. बीड मध्ये किती गुन्हेगारीता वाढली आहे यांची प्रचिती काल गृहराज्य मंत्री योगेश कदम यांनी अनुभवली आहे. मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी देऊन त्यांच्या कुटुंबाला न्याय मिळावा हीच अपेक्षा संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला आहे. परंतु या महायुती सरकार ने गुन्हेगार पोसले आहेत. न्यायाची अपेक्षा कोणाकडून ठेवायची हाच गहन प्रश्न असल्याचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम सांगितले.



बीड : दिनांक ५ एप्रिल रोजी महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री मा श्री माणिकराव कोकाटे साहेब यांनी शेतकऱ्यांचा अपमान केल्या प्रसंगी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने जाहीर निषेध करून माणिकराव कोकाटे साहेबांचे फोटो जाळण्यात आले यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री राजू गायके चंद्रशेखर जाधव अशोक गायके गोरख गायके गोपीनाथ कथले सुलक्षण गायके प्रवीण कथले अंकुश गायके समाधान कदले श्रीराम गायके आदी शेतकरी उपस्थित होत

## चंपावती शाळेत मुलीला पाहून अश्लिल कृत्य शिक्षकांसह नागरीकांनी नराधमास बेदम चोपले

### शिवाजीनगर पोलीस ठाण्यात पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल

बीड, (लोक इच्छा न्युज):-नगर रोडवर असलेल्या चंपावती प्राथमिक शाळेमध्ये जावून तेथील मुलींकडे पाहुन एका नराधमाने अश्लिल कृत्य केले. हाप्रकार शाळेच्या शिक्षकांच्या निदर्शनास आल्यानंतर त्याल पकडून बेदम चोप देण्यात आला. पालकांसह इतर नागरीकांनीही त्याला चांगलेच धुतले ही घटना आज सकाळी शाळेच्या दुसऱ्या मजल्यावर घडली. शिक्षकांनी त्यास पोलीसांच्या स्वाधिन केले असून त्याच्या विरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. श्रीमंत आश्रुबा टाकसाह (रा. हिवरसिंगा ता. शिरूर) हा नराधम आज सकाळी नगर रोडवर असलेल्या चंपावती प्राथमिक शाळेच्या दुसऱ्या मजल्यावर गेला. तेथील चौथीच्या वर्गासमोर जावून त्याने मुलींकडे पाहुन अश्लिल कृत्य केले हा प्रकार काही शिक्षकांच्या निदर्शनास आल्यानंतर त्याला पकडून बेदम चोप देण्यात आला ही माहिती पालकांसह नागरीकांना झाल्यानंतर त्यांनीही त्यास चांगलेच तुडवले. या घटनेने शाळा परिसरात एकच खळबळ उडाली. शिक्षकाने त्यास शिवाजीनगर पोलिसांच्या स्वाधिन केले. या प्रकरणी शाळा प्रशासनाच्या वतीने त्याच्या विरोधात तक्रार दाखल करण्यात आली. नराधम श्रीमंत टाकसाळ यांच्या विरोधात कलम ७५/७९ सह कलम १२ पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



बीड : आ.संदिप क्षीरसागर यांचे खंदेसमर्थक सुशिल जाधव यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देतांना बीडचे लोकप्रिय आमदार संदीपभैय्या क्षीरसागर, माजी आमदार सय्यद सलीम, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, झुंजार धांडे व मित्र परिवार दिसत आहे



# माझ्या मुलीला., निकाल लागताच करुणा शर्मांचा पहिल्यांदाच सनसनाटी आरोप

करुणा शर्मा यांना मोठा दिलासा मिळाला आहे. धनंजय मुंडे यांची याचिका माझगाव सत्र न्यायालयानं फेटाळली आहे. करुणा शर्मा यांना पोटगी देण्याचा निकाल न्यायालयाकडून कायम ठेवण्यात आला आहे. करुणा शर्मा यांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे धनंजय मुंडेंची याचिका न्यायालयानं फेटाळली आहे. करुणा शर्मा यांनी न्यायालयामध्ये धनंजय मुंडेंचं स्वीकृतीपत्र आणि अंतिम इच्छापत्र तसेच आपला पासपोर्ट आणि रेशनकार्ड न्यायालयात सादर केलं. या कागदपत्रांवर न्यायालयानं शिक्कामोर्तब केलं आहे, त्यामुळे करुणा शर्मा यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र दुसरीकडे ही कागदपत्रं खोटी असल्याचा दावा धनंजय मुंडे यांच्या वकिलाकडून करण्यात आला आहे. दरम्यान माझगाव कोर्टानं दिलेल्या निकालानंतर करुणा शर्मा यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी अनेक गंभीर आरोप केले आहेत. नेमकं काय म्हणाल्या करुणा शर्मा? मी न्यायाधीश यांचे आभार मानते की मला न्याय मिळाला. आज सत्याचा विजय झाला. मी सात ते आठ वेळा धनंजय मुंडे यांना तोंडावर पाडलं आहे. महिलांसाठी ही एक आदर्श केस आहे. राज्याची सिस्टीम ढासळली आहे, मी खरी होते, म्हणून मंत्र्यांना हरवू शकले. मीच मुंडे यांची पहिली बायको असल्याचं सिद्ध झालं आहे. त्यासाठी पोटगी मिळाली आहे. लग्नाचे फोटो व पुरावे मी मिडीयावर टाकणार आहे, असं करुणा शर्मा यांनी म्हटलं आहे. दरम्यान करुणा शर्मा यांना प्रेमजाळ्यात फसवून लग्न केल्यास त्याला २० लाख देण्याचे षडयंत्र सध्या सुरु आहे. मुंडे यांची गँग हे षडयंत्र रचत आहे. धनंजय मुंडे यांचं एवढं डोकं नाहीये. बीडचा आका आत गेला आहे, पण आता हे काम पुण्याचा आका करत आहे, असा आरोप यावेळी करुणा शर्मा यांनी यावेळी केला आहे. मुंडे यांच्या विरोधात बोलल्यास माझ्या मुलीला उचलून नेण्याची धमकी दिली जात आहे. शिवानीला उचलून नेण्याची धमकी मला त्यांचे लोक देत आहेत. मी या प्रकरणात तक्रारही केली आहे. मी तक्रार करून पाच ते सहा दिवस झाले आहेत. व्हॉटसअपवर मला धमकी दिली जात आहे, असा आरोपही करुणा शर्मा यांनी केला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार ६ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# संपादकीय

## या तीन गोष्टी

ङ्गअगर आप के घर में यह होता है तो…फकिंवा ङ्ग…म्हणून ही अभिनेत्री घरातच करते मेकअपफ असे रीलंही आम्ही मनापासून पाहतो आणि घरी सांगतो. बघा, पाऊस सुरू झाला आता… कसं करायचं? निघणार होते ना मी आत्ता बाहेर… साधं बहिणीकडे जायचं म्हटलं, तरी अडचणी हज्जार…फ बायको करवादली. कोणावर, असा प्रश्न तुमच्या मनात उमटण्याचं कारण नाही. या जगात कोणत्याही कारणावरून कोणीही आमच्यावरच करवादत असतं. ङ्गआधी तो फोन बाजूला ठेवा पाहू…फ ही जोड तिनं दिली आणि आम्हाला भरून आलं. सध्या (सध्या या शब्दामागं गेल्या दोन-चार वर्षांपासून ते काल परवापर्यंत असं काहीही येऊ शकतं), तर सध्या आमच्याकडं ङ्गतो फोन बाजूला ठेवाफ हा परवलीचा शब्द झाला आहे. आमच्या कुटुंबाच्या आजूबाजूला घडणाऱ्या यच्चयावत गोष्टी केवळ आम्ही आमचा मोबाइल हाती घेतल्यामुळं घडतात, असा ठाम विश्वास संपूर्ण कुटुंबाचा आहे. आत्ता मात्र आम्हाला फार म्हणजे फारच भरून आलं. अवकाळी पावसाचं कारण आपण आत्ताच हाती घेतलेला मोबाइल आहे, हे जाणवल्यानंतर आम्ही जे लोळत पडलो होतो, ते अंमळ कूस बदलून थोडे हलते झालो. या आधी केवळ घरातील टीव्ही बंद पाडण्याचं खापर आम्ही आणि आमच्या मोबाइलवर फुटलं होतं. आता चक्क पाऊस! असो, एकूण काय, तर आमच्या परिवाराच्या परिघात जे जे काही होतं ते ते सारं काही आम्ही मोबाइल हाती घेतल्यानं होतं. आमच्या घरातील मुलं तेच करीत असतात; पण त्यांना बोलण्याची सोय नाही. निवृत्तीनंतर अंमळ लोळत पडलेलो आम्ही आणि आमच्या हातातील आमचा मोबाइल मात्र साऱ्या घराचं डोकं कसं काय उठवतो, हे आम्हाला अद्याप न सुटलेलं कोडं आहे. या छोट्याशा यंत्राची उपयुक्तता घरच्यांच्या अजिबातच लक्षात आलेली नाही आणि घरातील तरुण पिढीलाही समजत नाही, हे आमच्यासाठी अत्यंत कष्टाचं आणि दु:खद आहे. अहो, एका जागी पडल्या पडल्या वेगवेगळे पॉडकास्ट ऐकून आमचं राजकीय आकलन कमालीचं वाढलं आहे. दैवयोगानं आम्ही निम्नमध्यमवर्गीय स्तरातील असल्यानं कोणत्याच एका टोकाला जाणं आम्हाला परवडत नाही. त्यामुळं आम्ही साऱ्यांचं सारं गपगुमान ऐकून घेतो. बरं, आम्ही फक्त राजकीय पॉडकास्टच ऐकतो असं नाही, कलाकार, नेते, आध्यात्मिक, धार्मिक मंडळी असं सगळ्यांचं सगळं ऐकतो. मागं एकदा तर अघोरी साधूचा पॉडकास्टही ऐकला होता आणि त्यानंतर तशीच रील सातत्यानं मोबाइलवर येत होती. त्यातील अनेकानेक गोष्टी ऐकून आम्हाला भांबावून जायला झालं होतं. अर्थात, आम्ही मिळालेलं कोणतंही ज्ञान स्वत:पाशी चुकूनही ठेवत नाही. ज्ञान वाटलं, की ते वाढतं यावर आमचा पक्का विश्वास आहे. ङ्गया तीन गोष्टी कधीही आपल्या घरात ठेवू नकाफ किंवा ङ्गअगर आप के घर में यह होता है तो…फ किंवा ङ्ग…म्हणून ही अभिनेत्री घरातच करते मेकअपफ असे रीलंही आम्ही मनापासून पाहतो आणि घरी सांगतो. ङ्गएकदा या माणसाला घराबाहेर ठेवून पाहिलं पाहिजे…फ आमच्या आईनं हे मत आमच्या कुटुंबापुढं मांडलं आणि त्यावर दोन्ही लेकरांनी एकमेकांना टाळी दिल्याचं पाहिल्यावर आम्ही जे भिंतीकडं तोंड करून पडलो, ते तब्बल तीन तास तसेच्या तसे होतो; पण आम्ही माघार घेणाऱ्यातले नाही. वेगवेगळे रील, त्यातून मिळणाऱ्या मौलिक सूचना यांकडं आम्ही फार आशेनं पाहतो. दहा दिवसांत घरात पैशांचा पूर येईल, असं सांगणारे किमान पंधरा रील मी जपून ठेवले आणि घरून कितीही विरोध झाला, तरी तसं करून पाहिलं आहे. त्यानंतर प्रत्येक वेळी ङ्गदेहाला कष्ट दिले असते, तर…फ अशी सुरुवात होणारी वाक्यं मी कानाआडही केली आहेत. रील, व्हिडिओ, त्यावरही कॉमेडी, उपाय, उपचार, सल्ले हे सारं गांभीर्यानं घेण्यासारखं असतं, असं मानणाऱ्यांचं आम्ही प्रतिनिधित्वच करतो म्हणा ना. या साऱ्यातून आम्ही एका निष्कर्षापर्यंत पोहोचलो आहोत. आपण, आपला मोबाइल आणि चार्जर हेच अंतिम सत्य आहे. बाकी कोणी काहीही म्हटलं, तरी त्याकडं दुर्लक्ष करावं. शेवटी काय, काही दिवस ट्रेंडचे आणि काही दिवस वादांचे. आपण दोन्हीकडं ङ्गबघेफ राहायचं. उगा नव्या गाण्यावर डुलायचं नाही, की वादात पडायचं नाही. मग हे जगणं सुखाचंच आहे.

# आकाशवाणी मुंबई तारका प्रतिभा पाटील – बिर्जे

प्रतिभा पाटील - बिर्जे यांचे मुंबई जवळचे पालघर हे मूळगाव आहे. त्या पोर्तुगीज चर्चजवळ दादर रहात होत्या. त्यांचे माहेर, सासरचे घराणे सुसंस्कृत
कलासक्त, सृजनशील.अत्यंत मोहक, बुद्धिमान, विनयशील, निगर्वी,अजात शत्रू आकाशवाणी तारका प्रतिभा पाटील यांचा जन्म ४ नोव्हेंबर १९५९ रोजी मुंबईत दादर मध्ये झाला. त्यांच्या आई तारामती पाटील सर्व कलाप्रेमी गृहिणी तर वडील हरिश्चंद्र पाटील हे पश्चिम रेल्वेत लोअर परळ कार्यशाळेत विभाग प्रमुख होते. त्यांचे शालेय शिक्षण विलेपार्ल्यात महिला संघ शाळेत झाले. त्यांनी बाराव्या वर्षी आत्मविश्वासाने अभिनेत्री प्रिया तेंडुलकर यांची मुलाखत घेतली आणि रसिकांची वाहवा मिळवली. प्रतिभा पाटील यांनी साठे महाविद्यालयातून बी.ए., एम.ए. विल्सन महाविद्यालया मधून सर्वोत्तम गुणांनी पदव्या संपादन केल्या. ज्येष्ठ साहित्यिक प्रा. वसंत देव, प्रा. चारुशीला ओक यांनी भाषेचे संस्कार, प्रोत्साहन दिले. पत्रकारितेचा अभ्यासक्रम पूर्ण केल्या नंतर त्यांनी रुपारेल मधून डी.एम. एल.टी. (पॅथॉलॉजी) केले. चर्नीरोडच्या रशियन केंद्रातून रशियन भाषेची पदवी मिळवून त्या भाषेवर त्यांचे प्रभूत्व होते. सन १९८६ पासून त्या नैमित्तिक करारावर मराठी/ हिंदी निवेदिका पदा सह आकाशवाणीच्या सर्व विभागांत आमंत्रित करायचे. मूळ मराठी असून, सर्वोत्तम उर्दू उच्चार, कार्यक्रमाचं कौशल्य केले. परिपूर्ण आयोजन, सुंदर सादरीकरणामुळे त्यांचे कार्यक्रम अविस्मरणीय आहेत. सन १९८७ मध्ये देशातल्या अनेक राज्यांतून आलेल्या हजारो उमेदवारांतून पहिल्या येऊन कायम स्वरुपी हिंदी निवेदिका पदावर सुश्री. प्रतिभा पाटील या आकाशवाणी मुंबई केंद्राच्या सेवेत रुजू झाल्या. याचे श्रेय त्या आकाशवाणीच्या त्यांच्या निस्वार्थ, भक्ती, समर्पिततेला देतात. मुंबई संवादिता केंद्राचे सुबह सवेरे, पहिलं एफ.एम. मुंबई केंद्राचे प्रसारण करण्याचा मान सन १९९२ मध्ये त्यांना मिळाला. त्यांच्या एफ.एम. गोल्ड, रेनबो केंद्रांच्या प्रारंभाच्या काळातले मनभावन, यादों के झरोखों से, असे अनेक कार्यक्रम त्यांनी लोकप्रिय केले.
दुपार झाली की, आकाशवाणी मुंबई ‘अ’ संवादिता केन्द्राचे श्रोते आतूर व्हायचे ऐकायला, ‘यह आकाशवाणी का मुंबई केंद्र हैं। नारी जगत में प्रतिभा का प्यार भरा नमस्कार। आपल्या सुमधुर स्वरात श्रोत्यांच्या मनाला साद घालणाऱ्या या प्रतिभा
म्हणजेच आकाशवाणी मुंबई केंद्राच्या ज्येष्ठ हिंदी निवेदिका
सुश्री. प्रतिभा हरिश्चंद्र पाटील : सौ. प्रतिभा स्नेहल बिर्जे. आकाशवाणी मुंबई केंद्राचे आंबट गोड, कामगार सभेतल्या सहज सुचलं म्हणून,आपलं पत्र पोहोचलं, माझं आवार माझं शिवार मधल्या अवती-भवती श्रुतिका अशा कार्यक्रमांना अनमोल सहभाग दिला. आकाशवाणीच्या निबंध स्पर्धेत अनेक पारितोषिके त्यांना मिळाली. शीघ्र कवयित्री असलेल्या प्रतिभा पाटील बिर्जे यांनी अनेक आशयघन कविता लिहिल्या आहेत, तसेच अनेक
सामाजिक समस्यांवर लिहिलेल्या कथा आकाशवाणीतून सामाजिक बांधिलकीच्या नात्याने सादर केल्या. आकाशवाणीला आपले कार्यक्षेत्र निवडणाऱ्या नवोदितांना त्या अनमोल मार्गदर्शन करायच्या.अशाच आकाशवाणीत भेटलेल्या कलाकारांना अभिनेते,अभिनेत्री प्रस्थापित झाल्याचे त्यांना कौतुक वाटे. विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या व्यक्ती तपस्वी कलाकार यांच्या आकाशवाणीत मुलाखती घेण्यात त्या नेहमी अग्रेसर होत्या.’ नारी जगत’ कार्यक्रमात ज्येष्ठ पार्श्वगायिका ‘ महाराष्ट्र भूषण ‘ आशा भोसले यांची मुलाखत इतकी रंगली की, रसिकांच्या आग्रहास्तव पुनः प्रसारित करावी लागली. या मुलाखतीत संगीता सह आशाताईंचा स्वयंपाक घरातला वावर, खाद्य संस्कृतीवरचे त्यांचे विचार, गृहिणींशी व्यक्त केलेले मनमोकळं मनोगत; हे विशेष होते. ज्येष्ठ भजन सम्राट अनुप जलोटा, क्रीडा समालोचक सुरेश
सरैया, सनदी अधिकारी नीला सत्यनारायण, इंग्लिश खाडी पोहून जाणाऱ्या आरती प्रधान, भारोत्तोलक मधुमती कटके, त्यांची सुद्धा आकाशवाणीतून अन्य मुलाखतीत सादर केली.
कधी वातावरणातला बदल त्यांना कळला, तर आधीचे निवेदन बाजूला ठेवून असह्य उकाड्या नंतर नभ मेघांनी आक्रमिले, पाऊस सुरू झाला की, त्यांच्या प्रतिभेचा अप्रतिम आविष्कार त्यांच्या निवेदना सह वर्षा गीतांचा अपूर्व संगम होत असे. ज्येष्ठ आकाशवाणी निवेदक अमीन सायानी म्हणाले होते की, “ महोदया, आप यहाँ क्या कर रही हैं?, आपको दूरदर्शन पर आना चाहिये ! अशी स्तुति सुमने त्या विनम्रपणे स्वीकारीत. सौ. प्रतिभा पाटील - शेखावत काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा असताना, त्यांच्या जाहीर
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुश्री. प्रतिभा पाटील यांनी इतके प्रभावी केले की, त्यांनी आग्रहाने सांगितले की, माझ्या या पुढच्या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन तुम्हीच करायचे. सौ. प्रतिभा पाटील यांनी सुश्री. प्रतिभा पाटील यांना दिलेली उत्स्फूर्त दाद न भूतो न भविष्यति आहे. स्वामी समर्थां वर एक सीडी आहे, त्याचं निवेदन प्रतिभा1 बिर्जे नी सुरेल आवाजात; ओघवत्या शैलीत केले आहे. त्यांना त्यांच्या सारख्या स्वभावाचे मनमिळाऊ, नेहमी प्रोत्साहन देणारे डॉ. स्नेहल बिर्जे हे पती लाभले. ज्यांनी समाजसेवक, माजी आमदार डॉ. माधव नारायण बिर्जे त्यांचा समाज सेवेचा वारसा पुढे चालवला.

# वयोवृद्ध लाभार्थ्यांसाठी तहसील कार्यालय बीड येथे सुविधा – तहसीलदार शेळके यांनी केली आस्थेवाईकपणे विचारपूस

. (बीड लोक इच्छा न्युज ) संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजना अंतर्गत वयोवृद्ध लाभार्थ्यांसाठी तहसील कार्यालय , बीड येथे विशेष व्यवस्था करण्यात आली आहे . या उपक्रमांतर्गत तहसील कार्यालयाच्या आवारात बाकडे टाकून बसण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून , सावलीसाठीही योग्य अशी व्यवस्था करण्यात आली आहे . त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याची सोयही करण्यात आली आहे .

लाभार्थ्यांना कोणतीही अडचण होऊ नये या उद्देशाने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्वतः उपस्थित राहून लाभार्थ्यांची आस्थेवाईकपणे विचारपूस केली . वयोवृद्ध व्यक्तींच्या समस्यांचा आढावा घेत त्यांनी यावेळी प्रत्येकाशी संवाद साधला आणि त्यांच्या गरजांची विचारणा केली .

“ कोणालाही काही अडचण आली , तर मला 9595184545 या क्रमांकावर थेट फोन करा ,” असे आवाहन त्यांनी यावेळी उपस्थित लाभार्थ्यांना केले. त्यांच्या या समर्पित आणि संवेदनशील भूमिकेमुळे उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची कार्यालय प्रमुखांनी स्वतः भेट घेतली पाहिजे त्यांच्या समस्या जाणून त्यावर तात्काळ तोडगा काढावा अशा सूचना केल्या आहेत . सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी सुद्धा वेळोवेळी संजय गांधी श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांची कामे प्राधान्याने करण्यात यावी असे सर्व तहसीलदार यांना सुचित केलेले आहे . याच अनुषंगाने बीड तहसील कार्यालयात ही व्यवस्था करण्यात आल्याचे दिसून आले . बीड तालुका तसा मोठा तालुका आहे . या तालुक्यात संजय गांधी योजनेचे म्हणजेच ज्यांचा वयोगट 18 ते 65 वर्षे आहे , त्यांची लाभार्थी संख्या 8860 इतकी आहे . या लाभार्थ्यांना राज्य शासनामार्फत प्रतिमाह 1500 रुपये इतके मानधन देण्यात येते . श्रावण बाळ योजनेचे लाभार्थी हे 65 वयापुढील असतात . अशा लाभार्थ्यांची तहसील बीड अंतर्गत संख्या 8824 इतकी आहे . 65 वर्षावरील लोकांना इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन अनुदान योजना सुद्धा असून त्या योजनेचे 3731 लाभार्थी आहेत . या योजनेत राज्य शासन 1000 रुपये तर केंद्र शासन 500 रुपये इतके मानधन लाभार्थ्यांना देत असते .

संजय गांधी विभागाचे नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी कळविल्यानुसार श्रावण बाळ योजना व संजय गांधी योजनेच्या 8664 लाभार्थ्यांना अनुदान वितरित करण्यात आलेले असून इंदिरा गांधी योजनेच्या 3731 लाभार्थ्यांना अनुदान वितरित करण्यात आलेले आहे . तथापि आधार पडताळणी न झालेले लाभार्थ्यांची संख्या 3616 इतकी असल्याचेही त्यांनी सांगितले .

संजय गांधी विभागाची सध्या डीबीटी पोर्टलवर लाभार्थी नोंदणी करण्याची मोहीम वेगाने सुरू आहे . यासाठी अव्वल कारकून हेमलता परचाके , महसूल सहायक वैशाली बहिरवाळ , गंगाधर जवरे यांच्यासह ऑपरेटर महेंद्र राऊत मोठ्या प्रमाणात मेहनत घेत आहेत .





सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने संजय गांधी , श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांना बसण्याची व्यवस्था असावी , पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी असे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या लक्षात आले . तशी व्यवस्था झाली अथवा नाही याची चाचपणी करण्यासाठी त्यांनी शुक्रवार दिनांक 4 एप्रिल रोजी संजय गांधी विभागास भेट दिली . लाभार्थ्यांना बसण्यासाठी असलेल्या व्यवस्थेची पाहणी करून समाधान व्यक्त केले . लाभार्थ्यांशीही त्यांनी चर्चा केली . यावेळी त्यांनी स्वतःचा मोबाईल क्रमांक देत मला कधीही संपर्क साधा , जास्त धावपळ करू नका , उन्हातान्हाचा प्रवास करू नका असे लाभार्थ्यांना सांगितले .

यावेळी तहसीलदार शेळके यांनी लाभार्थ्यांशी चर्चा करताना सविस्तर माहिती दिली . यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की डीबीटी म्हणजेच डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर नोंदणी सर्वांना करणे आवश्यक आहे . त्यासाठी लाभार्थ्यांचे आधार कार्ड हे ला मोबाईल क्रमांकास लिंक असणे अनिवार्य आहे . कुठल्याही आधार केंद्रावर अथवा महा-ई-सेवा केंद्रावर जाऊन तुम्हाला ते तपासता येईल . आधी मोबाईल क्रमांक आधार कार्डशी जोडून घ्यावा , त्यानंतर आपलं बँक खातं हे आधार कार्डशी लिंक आहे की नाही हे पहावं . त्यासाठी महा-ई-सेवा केंद्र किंवा आपले सरकार केंद्रावरून आपले आधार कार्ड बँक खात्याशी जोडले आहे का हे तपासावे . तसे ते जोडलेले नसल्यास बँकेत जाऊन ते लिंक करून घ्यावे .

वरील बाबी पूर्ण झाल्यास डीबीटीची प्रक्रिया करण्यासाठी तहसील कार्यालयात येणे आवश्यक आहे . यासाठी वयोवृद्ध लाभार्थ्यांनी कोणाला तरी सोबत आणावे . सोबत मोबाईल आणणे आवश्यक आहे . कारण डीबीटीचा अर्ज भरून घेताना त्यावर मोबाईल क्रमांक सुद्धा टाकावा लागतो . आणि लगेच त्या मोबाईल क्रमांकावर एक ओटीपी म्हणजेच वन टाइम पासवर्ड जातो . तो ओटीपी सांगावा लागतो . तो ओटीपी ऑपरेटरला सांगितल्यास लगेच डीबीटीची प्रक्रिया संपते . एकदा ओटीपी दिला आणि तो ऑपरेटर मार्फत संगणकावर नोंदविण्यात आला म्हणजे डीबीटीची प्रक्रिया संपलेली असते . त्यानंतर मात्र लाभार्थ्यांनी थोडे संयमाने राहून मानधनाची वाट पहावी . शासनाकडून मानधन येण्यास आणि प्रत्यक्ष लाभार्थ्याच्या खात्यावर जाण्यास काही कालावधी लागू शकतो . अशावेळी लाभार्थ्यांनी स्वतः तहसील कार्यालयात विनाकारण चकरा न मारता फोनवर विचारणा केली तरी त्यांना तशी माहिती देता येईल . विनाकारण हेलपाटा होणार नाही . डिबीटी साठी येताना लाभार्थ्यांनी सोबत येताना आधार कार्ड , बँक पासबुक , झेरॉक्स सेंटरवरून उपलब्ध असलेला डीबीटी साठीचा अर्ज आणि राशन कार्ड चा ऑनलाईन क्रमांक सोबत आणावा . वयस्कर लाभार्थी त्यांच्या नातेवाईकांना पाठवू शकतात . तथापि ते नातेवाईक असल्याचा पुरावा त्यांना तहसील कार्यालयात दाखवावा लागेल . जेणेकरून डीबीटी प्रक्रिया करून घेता येईल .

बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी काही दिवसापूर्वी आढावा घेऊन संजय गांधी विभागाने डीबीटी साठीची प्रक्रिया पूर्ण करावी असे आवाहन केले होते . बीड तहसील कार्यालय अंतर्गत अद्यापही 5400 लाभार्थ्यांची डीबीटी पोर्टलवर माहिती नोंदविण्यात आलेली नाही . यात शहर विभागातील अनेक लाभार्थी आहेत . त्यामुळे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी शहरातील नगरसेवक , प्रतिष्ठित व्यक्ती यांना आवाहन केले आहे की आपण आपल्या स्तरावरून निशुल्क डीबीटी कॅम्पचे आयोजन केल्यास त्या ठिकाणी तहसील कार्यालयामार्फत ऑपरेटर आणि अधिकारी कर्मचारी पाठवता येऊ शकतील आणि ही प्रक्रिया तात्काळ करता येऊ शकेल .

तहसीलदार शेळके यांची ही कृती प्रशासनाच्या जनहितकारी आणि संवेदनशील दृष्टिकोनाची साक्ष देणारी ठरली असून , या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे .

# आर्किटेक्ट अर्शद शेख यांच्या ग्रंथाचे थाटात प्रकाशनएस.एम.युसूफ यांच्या कार्याचे केले कौतुक

बीड (प्रतिनिधी लोक इच्छा न्युज) - सुप्रसिद्ध आर्किटेक्ट अर्शद शेख यांच्या इस्लाम द अल्टिमेट आर्ट ऑफ लिव्हिंग या ग्रंथाचे दिनांक ०३ एप्रिल २०२५ रोजी थाटात प्रकाशन करण्यात आले. या ग्रंथासाठी सहकार्य करणारे मुक्तपत्रकार एस.एम. युसूफ़ यांच्या कार्याचे यावेळी अर्शद शेख यांनी तोंड भरून कौतुक केले. अर्शद शेख हे पेशाने जरी आर्किटेक्ट असले तरी समाजातील इतर क्षेत्रात सुद्धा सातत्याने विविध कार्य करत असतात. यात सामाजिक कार्यांसह लेखन कार्यही प्रमुख आहे. यापूर्वी सुद्धा त्यांनी आर्किटेक्शचर आणि अर्शदनामा ही पुस्तके लिहिली आहेत. इस्लाम द अल्टिमेट आर्ट ऑफ लिव्हिंग या त्यांच्या तिसऱ्या पुस्तकाचे प्रकाशन दिनांक ०३ एप्रिल २०२५ रोजी रात्री ०८:०० वा. अहेमदनगर येथील सिटी लॉन्स या मंगल कार्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लखनऊ विद्यापीठाचे सेवानिवृत्त कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे अध्यक्षस्थानी होते तर औरंगाबाद येथील सरस्वती भुवन महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. ऋषिकेश कांबळे आणि विख्यात साहित्यिक डॉ. इकबाल मिन्ने यांची प्रमुख उपस्थिती होती. इस्लाम द अल्टिमेट आर्ट ऑफ लिव्हिंग या ३६० पानी ग्रंथाचे प्रकाशन पूर्व वाचन करून



करेक्शन करण्याचा बहुमान अर्शद शेख यांनी बीड शहरातील मुक्तपत्रकार एस.एम. युसूफ़ यांना दिला होता. युसूफ़ यांनी आलेली जबाबदारी स्वीकारून ग्रंथाचे प्रकाशन पूर्व वाचन करून उत्कृष्ट करेक्शन केल्याने आर्किटेक्ट अर्शद शेख यांनी याप्रसंगी बीडहून कार्यक्रमात उपस्थित राहिलेले व्यावसायिक मिर्झा ख़िज़र बेग, जमात ए इस्लामी हिंद चे ज्येष्ठ पदाधिकारी सय्यद शफ़ीक़ हाश्मी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या उर्दू विभागाचे अशासकीय सदस्य सय्यद हसीन अख्तर, इंजि. मज़हर कादरी आणि मिर्झा इरतेकाझ अफ़ज़ल बेग यांच्या उपस्थितीत युसूफ़ यांच्या कार्याचे तोंड भरून कौतुक केले. यावेळी बोलताना युसूफ़ यांनी अर्शद भाई यांच्यामुळे इस्लाम आणि मुहम्मद पैगंबर यांच्या जीवनावर आधारित ग्रंथाचे करेक्शन करण्याची संधी मिळाली हे माझे भाग्यच म्हणावे लागेल असे म्हटले.

# श्रीराम जन्मोत्सव सर्व भाविक भक्तांनी मोठ्या उत्साहात साजरा करावा नवनाथ अण्णा शिराळे



बीड प्रतिनिधी.लोक इच्छा न्युज श्रीराम जन्मोत्सव सर्व श्रीराम भक्तांनी मोठ्या आनंदात आणि मोठ्या उत्साहात साजरा करावा आणि श्री कंकालेश्वर मंदिर या ठिकाणावरून श्री प्रभू चंद्राची विधीवत महापूजा संपन्न झाल्यानंतर बीड शहरातून सर्वत्र श्री प्रभू रामचंद्राची मिरवणूक काढण्यात येणार आहे या मिरवणुकीमध्ये सर्व भाविक भक्तांनी लाखोच्या संख्येने उपस्थित राहून हा जन्मोत्सव साजरा करावा आणि कोणाच्याही भावना दुखावणार नाहीत याची सर्वांनी दक्षता घ्यावी आणि कोणाच्याही अंगावर गुलाल वगैरे टाकू नये सर्वांनी शिस्तीमध्ये श्रीराम चंद्र प्रभूची ची मिरवणूक साजरी करावी ही मिरवणूक बीड येथील प्रसिद्ध असलेले श्रीक्षेत्र कंकालेश्वर मंदिर येथून चार वाजता निघून सुभाष रोड वरून माळवेस मंदिराच्या ठिकाणावरून श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकांमध्ये जाऊन श्रीराम जन्मोत्सव मिरवणुकीची त्या ठिकाणी सांगता होईल असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे.

# मोसंबीच्या झाडांना ठिबकद्वारे जीवामुत

पैठण तालुक्यातील देवगाव येथील शेतकऱ्याने मोसंबीच्या झाडांना ठिबकद्वारे जीवामृत सोडले. दोन्ही बहारातून त्यांनी सव्वा एकरात २० टन मोसंबीचे उत्पादन घेतले. शेतकरी विशाल हुसे यांनी जून २०१८ मध्ये सव्वा एकर क्षेत्रात मोसंबी झाडांची लागवड केली. बागेला रासायनिक खत न वापरता संगोपन केले. बागेतील तण ब्रशकटरच्या साहाय्याने नष्ट केले. तसेच महिन्यातून एकदा ते जीवन अमृत तयार करून ठिबकद्वारे सोडतात. त्यामुळे फळगळती पूर्णपणे बंद झाली. रासायनिक खताचा वापर न केल्याने खर्च कमी झाला आणि उत्पादन वाढले. हुसे यांच्या बागाची गुणवता व उत्पादन पाहून गावातील इतर शेतकऱ्यांनी जीवनअमृत तयार करण्यास सुरवात केली आहे. तयार करण्याची पद्धत २० लिटर गोमूत्र, २० किलो शेण एकत्र मिसळून त्याला ड्रममध्ये टाकावे. त्यात १०० लिटर पाणी, ५ किलो गावरान गूळ, ५ किलो हरभरा डाळीचे पीठ, दोन लिटर ताक व वडाच्या झाडाखालची दोन किलो माती हे सर्व मिसळून घ्यावे. मिश्रणाला आठ दिवस सकाळी व संध्याकाळी चांगले एकरूप होईपर्यंत मिसळून घ्यावे. मिश्रण सावलीच्या ठिकाणी तयार करावे. आठ दिवसानंतर गाळून ठिबकद्वारे सोडावे. गेल्या दोन वर्षांपासून मोसंबी बागेसाठी जीवनअमृत मिश्रण तयार करून ठिंबकव्दारे झाडांना देतो. याला कमी खर्च येतो. मिश्रणातून तयार झालेले किटाणू जमिनीत जाऊन जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढण्यास मदत होते. त्यातून उत्पादन वाढते.

# निळा येथून नांदेड जिल्ह्यात जिजाऊ रथयात्रेचे आगमन

## नांदेड शहरासह लोहा,कंधार,मुखेड,नरसी,नायगाव,उमरी,भोकर, तामसा,हदगाव आदी ठिकाणी होणार जिजाऊ रथयात्रेचे स्वागत

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : १८- मार्च रोजी शहाजी महाराज जयंती दिवशी भोसले गढी वेरूळ येथून निघालेल्या जिजाऊ रथयात्रा आज नांदेड जिल्ह्यातील निळा या गावात पोहोचली रथयात्रेचे ग्रामस्थांच्या व जिल्हाभरातील मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड जिजाऊ ब्रिगेड व ३३ कक्षांच्या वतीने व तमाम समाज बांधवांच्या वतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले. प्रारंभी निळा या ठिकाणी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जिजाऊ वंदनेने कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.याठिकाणी रथयात्रेची स्वागतसभा पारपडली.यावेळी अनेकांनी आपले विचार व्यक्त केले.




तदनंतर ही रथयात्रा नांदेड शहराकडे मार्गस्थ झाली. तर ६ व ७ एप्रिल रोजी जिल्ह्यात विविध ठिकाणी जिजाऊ रथयात्रेच्या स्वागतासाठी जय्यत तयारी केली आहे. मराठा सेवा संघाच्या वतीने १८- मार्च ते १- मे दरम्यान महाराष्ट्रभर मराठा जोडो अभियान हे ब्रीद घेऊन जिजाऊ रथयात्रा फिरणार आहे नांदेड मध्ये ही रथयात्रा निळा येथून शनिवार ५- एप्रिल रोजी दुपारपासुन ७-एप्रिल दुपारपर्यंत शहरासह विविध तालुक्यात फिरणार आहे त्या रथयात्रेच्या स्वागतासाठी जिल्ह्यात जय्यत तयारी चालु आहे. मराठा सेवा संघ महाराष्ट्रातच नव्हे जगभरात जिजाऊ,शिव,शाहु,फुले,आंबेडकर विचार जनमाणसात रूजविण्याचे काम केले आहे प्रबोधनाच्या माध्यमातुन अनेक लेखक,वक्ते,शाहीर, किर्तनकार निर्माण केले मराठा बहुजन समाजाला विविध विषयांवर सभा, कॉर्नर बैठकांच्या माध्यमातुन चर्चा करण्यासाठी आपापसातील संवाद वाढविण्यासाठी ही रथयात्रा महत्वाची ठरणार आहे.१८- मार्च रोजी शहाजी महाराज जयंती दिवशी भोसले गढी वेरूळ येथुन निघुन १- मे रोजी कामगार दिन व महाराष्ट्र दिनानिमित्त पुणे लालमहल येथे समारोप होणार आहे ही रथयात्रा नांदेड जिल्ह्यात शनिवार ५- एप्रिल रोजी दुपारी वसमत मार्गे आलेगाव,निळा,तळणी मार्गे नांदेड शहरात येईल व मुक्काम असेल ६- एप्रिल रोजी नांदेड शहरातुन गुरूद्वारा,सिडको,लोहा, कंधार,मुखेड व नरसी फाटा येथे मुक्काम असेल ७- एप्रिल रोजी नरसी फाटा येथुन निघुन नायगाव,उमरी,भोकर,हदगाव मार्गे उमरखेड जिल्ह्याकडे जाईल महाराष्ट्रभर फिरणाऱ्या या जिजाऊ रथयात्रेतुन नक्कीच सर्वंच चळवळींना बळ मिळेल व ऊर्जा मिळेल.सदरील रथयात्रेच्या स्वागतासाठी जय्यत तयारी चालु आहे लाखोंच्या संख्येने समाज बांधवांनी या रथयात्रेत सहभागी व्हावे असे आवाहन मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड व इतर कक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पेठ बीड भागातील विद्युत पुरवठा कायमस्वरूपी सुरळीत करा

पेठ बीड परिसरातील शास्त्री नगर, माऊली नगर, गांधी नगर, शहेनशा नगर, दिलावर नगर तसेच तेलगाव नाका येथील वीज पुरवठा गेल्या तीन दिवसांपासून बंद झाला आहे पेठ बीड या भागात मोल मजूरी ,कष्टकरी श्रमिक गोरगरीब आशा सामान्य लोकांचा जास्त प्रमाणात भरणा असून दिवसभर घाम गाळून काबाडकष्ट करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह केला जातो मात्र संध्याकाळी थोडाफार आराम करण्याच्या नेमक्या वेळेतच लाईट जाते.दोन दोन दिवस सतत वीज पुरवठा खंडित होत असल्यामुळे विद्युत कंपनीचे अधिकारी व कर्मचारी एक प्रकारे या लोकांच्या जखमेवर मीठच चोळत आहेत या भागात विद्युत कंपनीने नियुक्त केलेले अधिकारी कर्मचारी शुल्लक तांत्रिक बिघाडाकडे तीन-तीन दिवस दुर्लक्ष करून आपल्या कर्तव्यात निंदनीय प्रकारचा कसूर करीत आहेत. याची शिक्षा मात्र नाहक सामान्य नागरिकांना भोगावे लागत असून विद्युत पुरवठा सतत खंडित होत असल्यामुळे डेंगू ,मलेरिया ,असाध्य ताप, आशा विविध प्रकारच्या असाध्य जीवघेण्या आजारांना लहान बालके वृद्ध रुग्ण महिला भगिनी विद्यार्थी यांना बळी पडावे लागत आहे हा सर्व प्रकार थांबविण्यासाठी या भागातील विद्युत पुरवठा कायमस्वरूपी सुरळीत करवा नाहीतर विद्युत कंपनीच्या विरोधात लोकसाथी संघटना तीव्र स्वरूपाचे आंदोलन करणार आहे असा इशारा लोकसाथी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष राव जाधव , जयश्री ताई, व परिसरातील लोकांनी दिला आहे.

# राधाकृष्ण नगरीमध्ये हनुमान जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह

बीड (प्रतिनिधी):- बीड शहरातील पांगरी रोड भागातील राधाकृष्ण नगरीमध्ये प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी हनुमानजी जन्मोत्सव रविवार दिनांक ०६ एप्रिल ते १२ एप्रिल २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहात विविध नामवंत कीर्तनकारांच्या कीर्तन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहातील दैनिक कार्यक्रम, भजन, संप्रदाय कीर्तन, महाप्रसाद व हरिजागर कार्यक्रमास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. या सप्ताहात सकाळी ७.०० ते १०.०० ज्ञानेश्वरी पारायण, सायंकाळी ६.०० ते ७.०० हरिपाठ, रात्री ७.३० ते ९.३० सांप्रदायिक कीर्तन, ९.३० ते १०.३० महाप्रसाद व त्यानंतर हरिजागर होणार आहे. रविवार दि. ६ एप्रिल १००८ महामंडलेश्वर स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी महाराज यांचे कीर्तन, दि. सोमवार दिनांक ७ एप्रिल रोजी गणेश महाराज पिंपळे बीड, मंगळवार दि.०८ एप्रिल रोजी ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे, बुधवार दि. ९ एप्रिल रोजी ह.भ.प. त्र्यंबक महाराज मातकर सर, गुरुवार दि. श्रीमती प्रतिमाताई गायकवाड यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दि. १२ एप्रिल रोजी हनुमान जन्म सोहळा पहाटे ४.०० ते ६.०० रघु रुद्राभिषेक व महाआरती जन्मोत्सव तर सप्ताहातील काल्याचे किर्तन दुपारी ११.३० ते १.३० पान १ वरून महाबोधी महाविहार



.... वाजता ह.भ.प. महाराज कोळेकर श्री शेत्र शिंग ऋषी गड यांचे कीर्तन होणार आहे तर कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. राधाकृष्णनगरी बीड येथे होणाऱ्या या कार्यक्रमात गायनाचार्य हभप मनोज महाराज बोटे, गणेश महाराज पिंपळे, दत्तात्रय महाराज बहिर, गणेश महाराज ढोबळे, बंडू महाराज जटाळ,शंभू महाराज धांडे, संदेश महाराज येडे, विणेकरी वाल्मीक महाराज चाटे, मृदंगाचार्य चंद्रकांत महाराज शेळके यांची उपस्थिती लाभणार आहे. या शब्दातील कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन सप्ताह समितीचे आयोजक गणेश खाडे, मधुकर बालटे, दीपक गुळवे, मुकेश शिवगण, सच्चिदानंद देशमुख, नरेश कुलकर्णी, रवींद्र अण्णा बजगुडे, उमाकांत भोंडवे आदींसह आयोजन समिती व राधाकृष्णनगरी भागातील ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अर्धमसला गावकऱ्यांचे बीड बचाव मंच ने केले हार्दीक अभिनंदन



अर्धमसला येथील गावकऱ्यांनी लक्षणीय सहकार्य आणि जागरूकता दर्शविल्यामुळे महाराष्ट्रात सणासुदीच्या काळात मोठा घातपात व अनर्थ टळला. या संदर्भात बीड बचाव मंच द्वारे गावकऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. बीड बचाव मंचच्या कार्यात सक्रिय असलेल्या अनेक सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पदाधिकारी, वकील संघाचे प्रतिनिधी, शिक्षक संघटनांचे नेतृत्व, सामाजिक प्रतिष्ठानांचे कार्यकर्ते, आणि पत्रकार बंधू एकत्र आले होते. त्यांनी अर्धमसला येथील त्या मशिदीत झालेल्या आतंकवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सजगतेचे उदाहरण मूल्यांकन करीत एकत्र येऊन घेतलेल्या भूमिकेचे कौतुक केले. गावकऱ्यांचे एकत्र येणे आणि सर्व जात-धर्मातील लोकांचे सहकार्य यामुळे महाराष्ट्रात मोठा अनर्थ व घातपात घडवून आणण्याचा कट हाणून पाडण्यात यश मिळवले. या कार्याची दखल घेऊन बीड बचाव मंचाचे प्रमुख मार्गदर्शक डी.जी.तांदळे, नितीन जायभाय, भाऊराव प्रभाळे,ड.अनिल बारगजे,ड.नितीन वाघमारे, अशोकराव येडे, डॉ. संजय तांदळे, मौलाना मोईनुद्दीन शेख, बाजीराव ढाकणे, सादेकभाई सय्यद, अब्बासभाई शेख इस्लामपुरा, संजय कुलकर्णी आणि इतर सर्वांनी या अभिनंदन कार्यक्रमात महत्त्वाचा सहभाग घेतला.



गेवराई कृषी उत्पन्न बाजार समिती चे सभापती मुजीब_भाई_ पठाण आपणास वाढदिवसाच्या अगदी मनापासून शुभेच्छा यावेळी उपस्थित खरेदी विक्री संघाचे चेअरमन जयदिप भैय्या औटी मित्र परिवार

# अंथरवन पिंप्री येथील खून प्रकरणातील २ आरोपींना बीड जिल्हा न्यायालयाकडून शशर्थ जामीन मंजूर

बीड तालुक्यातील अंथरवन पिंपरी या गावांमध्ये ६ मार्च २०२५ रोजी एका विवाहितेचा गळा दाबून खून केल्याच्या आरोपा वरून पिंपळनेर पोलीस ठाणे येथे दाखल झालेल्या तक्रारी नंतर पोलिसांनी मयत महिलेचा पती, सासरा,सासू व जाऊ यांना अटक केली होती,त्यापैकी दोन आरोपींचा काल मा.बीड जिल्हा व सत्र न्यायालयाने शशर्थ जामीन मंजूर केला आहे. याबाबत



थोडक्यात माहिती अशी की, पिंपळनेर पोलीस ठाणे येथे दिनांक ७ मार्च २०२५ रोजी गु.र.नं. ५० /२०२५ नुसार कलम १०३,११५ (२), ११८ (१), ३ (५),व ८५ भा.न्या.सं.प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता त्या नुसार पोलिसांनी आरोपींना मा.न्यायालयात हजर केले असता प्रथम सात दिवस पोलिस कोठडीत आरोपींना घेऊन तपास करण्यात आला व नंतर आरोपींना जिल्हा कारागृह बीड येथे दाखल करण्यात आले होते ,मग दोन आरोपींनी ॲड.अनिल बारगजे,बीड यांचे मार्फत जामीन अर्ज मा.सत्र न्यायालयात दाखल केला होता त्यावर सुनावणी होऊन युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर सर्व कागदपत्रे,वस्तूस्थिती,तपास व ॲड.अनिल बारगजे यांचा योग्य युक्तिवादाचे आधारे या प्रकरणातील मयत हीचे सासू सासरे यांना मा.कोर्टाने जामीन दिला आहे. या प्रकरणाकडे अंथरवन पिंपरी गावातील व आजूबाजूचे परिसरातील लोकांचे लक्ष लागले होते.

# आष्टीच्या भरचौकात स्कूल बसला अपघात

आष्टी, (प्रतिनिधी):- कायम रहदारीच्या अहिल्यानगर बीड राष्ट्रीय महामार्गावरील आष्टी येथील बेलगाव चौकात शाळकरी मुलांना घेऊन निघालेली स्कूल बस झाडावर आदळून झालेल्या अपघातात चालकासह शाळकरी मुले जखमी झाल्याची घटना शनिवारी सकाळी घडली. सुदैवाने कसलीही जिवीत हानी झाली नाही. आष्टी तालुक्यातील कडा, वटणवाडी,जळगाव,येथील शाळकरी मुलांना नेहमीप्रमाणे आष्टी शहरातील एका खाजगी शाळेत घेऊन निघालेली स्कूल बस क्रमांक एम.एच १२,एच.बी.१५१४ हिला आष्टीवरून अहिल्यानगर कडे जात असलेल्या एका वाहनाने चकवा दिल्याने स्कूल बस चालकांचा स्टेअरिंग वरील ताबा सुटून बस रोडलगत असलेल्या एका मोठ्या झाडावर जाऊन आदळली.या अपघातात चालकासह, शाळकरी मुले जखमी झाली असून त्याच्यावर आष्टी,कडा येथील रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

# उन्हाच्या झळांमध्येही सेंद्रिय शेतीची तयारी जोमात

उन्हाचा पारा ३७ अंशांवर पोहोचला असतानाही मौज परिसरातील शेतकरी सेंद्रिय शेतीची मशागत करताना दिसत आहेत. पावसाळ्यात सेंद्रिय पिकांची लागवड करता यावी म्हणून शेतकऱ्यांनी आता कंबर कसली आहे. गावातील अनेक शेतकरी शेतीची खोल नांगरणी करून जमिनीत कुजलेलं शेणखत, गांडूळखत आणि कंपोस्ट खत मिसळत आहेत. पाण्याची टंचाई असूनही सकाळी व संध्याकाळी शेतात मशागत सुरू आहे. यंदा रासायनिक खतांचा खर्च टाळून अधिक दर्जेदार उत्पादन घेण्यासाठी शेतकरी सेंद्रिय खतांवर भर देत आहेत. गावातील काही शेतकऱ्यांनी जीवामृत आणि दशपर्णी अर्कासारखी जैविक द्रवखतं घरीच तयार केली आहेत. गेल्या काही वर्षांत जमिनीचा पोत खराब झाल्यामुळे उत्पादनात घट झाली होती. त्यामुळे जमिनीचं आरोग्य सुधारण्यासाठी आणि ग्राहकांना सेंद्रिय अन्न देण्यासाठी शेतकऱ्यांनी नवे पाऊल उचललं आहे.

# रामनवमी निमित्त उद्या निघणाऱ्या मोटार सायकल रॅली व शोभयात्रेस उत्स्फूर्त सहभागी व्हा-परशुराम गुरखुदे

बीड, (प्रतिनिधी):-६ एप्रिल २०२५, रविवार सकाळी ठीक ०९ : ०० वाजता श्री. गणेश मंदिर, बार्शी नाका, बीड येथून मोटार सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच प्रभु श्रीरामांची भव्य शोभायात्रा दुपारी ठीक ४ वाजता श्री. क्षेत्र कंकालेश्वर मंदीर येथून सुरू होवून शिवतीर्थ येथे सांगता करण्यात






येणार आहे. या निमित्ताने बीड शहरात आनंदाचे वातावरण तयार झालेले आहे, बीड शहर व तालुक्यातील सर्व राम भक्तांनी मोठ्या संख्येनी या प्रभु श्रीराम जन्मोत्सव सोहळा उत्साहात सहभागी होवुन या कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन द्वारकाधीश मित्र मंडळाचे अध्यक्ष परशुराम गुरखूदे यांनी केले आहे.



# किनवट शहरात श्रीराम नवमी निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन गोकुंद्यात रक्त तपासणी व रक्तदान शिबिर

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : किनवट शहरात श्रीराम नवमीचा पावन उत्सव मोठ्या उत्साहात आणि धार्मिक पद्धतीने साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने श्रीराम नवमी उत्सव समिती यांच्या वतीने शहरात भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तर गोकुंद्यातही श्रीराम नवमी उत्सव समिती गोकुंदा व थायरोकेअर लॅब किनवट हैद्राबाद यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत थायराँइड तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत स्व.बाळासाहेब ठाकरे चौक येथे करण्यात आले आहे. उत्सवाची सुरुवात श्रीराम मंदिरात सकाळच्या मंगल आरतीने होणार आहे. त्यानंतर सकाळी ९ वाजता शहरातून मोटारसायकल रॅली काढण्यात येणार असून, श्रीरामाचे जयघोष करत ही रॅली संपूर्ण शहरभर भ्रमण करेल. या रॅलीत युवकांचा उत्साह ओसंडून वाहणार असून, शिस्तबद्ध आणि भक्तिभावाने नटलेली ही रॅली सर्वांचे लक्ष वेधून घेईल.दुपारी १२ वाजता श्रीराम जन्मोत्सवाचे धार्मिक पूजन आणि कार्यक्रम पार पडणार असून, दुपारी १ वाजता सर्व भाविकांसाठी महाप्रसाद भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शेकडो भाविक सहभागी होणार असून, हा एक अध्यात्मिक आणि सामाजिक सलोख्याचा पर्वणीचा क्षण असणार आहे. संध्याकाळी ४ वाजता शहरातून श्रीरामाच्या मूर्तीची भव्य मिरवणूक निघणार आहे. या मिरवणुकीत विविध सुंदर देखावे, सांस्कृतिक झांज पथकं, भजन मंडळ्या आणि पारंपरिक वेशभूषेतील कलाकार सहभागी होणार आहेत. संपूर्ण शहरातून मार्गक्रमण करत ही दिमाखदार मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौकात समारोपास येईल.उत्सवाचा शेवट रात्री १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाआरतीने होणार आहे. हजारो भाविकांच्या उपस्थितीत आणि भगव्या झेंड्यांनी सजलेल्या वातावरणात गगनभेदी जयघोषात ही महाआरती पार पडणार आहे. या उत्सवानिमित्त शहरात सर्वत्र भगव्या पताका व झेंड्यांनी सजावट करण्यात आली आहे. श्रीराम नवमी उत्सव समितीचे युवा कारसेवक यांनी हे सर्व नियोजन अत्यंत नेटकेपणाने व भक्तिभावाने पार पाडले आहे. संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण आहे.किनवट तालुक्यातील ग्रामीण भागातील भाविकही या उत्सवात मोठ्या प्रमाणावर सहभागी होतात. हा उत्सव दरवर्षी शहरात अत्यंत उत्साहात व भक्तिभावाने साजरा केला जातो. यंदाही संपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन शिस्तबद्ध, भक्तिपूर्ण आणि सांस्कृतिक रंगांनी भरलेले असणार आहे.

# आ.हेमंत पाटील यांनी अतिदुर्गम सिंदखेड शिवारात रोहित्र उपलब्ध करुन दिल्याने शेतकरी सुखावले

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-किनवट : भोकरच्या कार्यकारी अभियंत्याकडे पाठपुरावा करून माहूर तालुक्यातील सिंदखेड शिवारातील चंद्राप्पा कोटेवार यांच्या शेतातील १०० के.व्ही. रोहित्र तात्काळ उपलब्ध करून दिल्याने मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष (कॅबिनेट मंत्री दर्जा महाराष्ट्र राज्य) तथा विधान परिषद सदस्य हेमंत पाटील यांनी रखखत्या उन्हात होरपळणाऱ्या पिकांना जीवनदान दिल्याबद्दल शेतकऱ्यांनी त्यांचे आभार मानले आहेत. वसंतात हेमंतांनी शेतशिवार फुलविले अशा प्रतिक्रिया ग्रामीण अतिदुर्गम भागातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

माहूर तालुक्यातील सिंदखेड शिवारातील चंद्राप्पा कोटेवार यांच्या शेतातील १०० के.व्ही. रोहित्र जळाल्याने भर उन्हाळ्यात पिकाला पाणी द्यावे कसे या विवंचनेत परिसरातील शेतकरी होते. अनेकांना सांगून कोणीही दखल घेईना अथवा दाद देईना. ही हवालदिल स्थिती पाहून या परिसरातील अतुल जाधव या शेतकऱ्यांने आपल्या भागाचे माजी खासदार तथा मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष (कॅबिनेट मंत्री दर्जा महाराष्ट्र राज्य) तथा विधान



परिषद गटनेते हेमंत पाटील यांचेशी संपर्क साधला.रोहित्र जळाल्याने परिसरातील सर्व शेतकऱ्यांची पिक पाण्याअभावी होरपळून गेल्याशिवाय राहणार नाहीत. त्यामुळे शेतकरी देशोधडीला मिळतील.तेव्हा आपण पाठपुरावा करून रोहित्र उपलब्ध करून द्यावे अशी विनंती केली.

तेव्हा कॅबिनेट मंत्री दर्जा असलेले विधान परिषद गटनेते हेमंत पाटील यांनी भोकर येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मं.कंपनीचे कार्यकारी अभियंता यांना पत्र देऊन माहूर तालुक्यातील सिंदखेड शिवारातील चंद्राप्पा कोटेवार यांच्या शेतातील १०० के.व्ही. रोहित्र तात्काळ उपलब्ध करणे पत्र दिले. त्यात असे नमूद केले की , माहूर तालुक्यातील मौ. सिंदखेड येथील चंद्राप्पा कोटेवार यांच्या शेतातील १०० के.व्ही. रोहित्र नादुरुस्त झाल्यामूळे तेथील शेतक-यांना कृषीपंपाकरिता वीज पुरवठा होत नसल्यामूळे त्यांच्या शेतामधील पिकांचे नुकसान होत आहे. तरी एकंदरीत शेतक-यांचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्याकरिता १०० के.व्ही रोहित्र तात्काळ उपलब्ध करुन सहकार्य करावे व उलटटपाली मला अवगत करावे. यानुषंगाने पाठपुरावा केल्याने संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरीत दखल घेऊन शेतात रोहित्र उपलब्ध करून दिल्याने सर्व शेतकऱ्यांनी हेमंत पाटील यांचे व महापारेषणचे कार्यकारी अभियंता यांचे आभार मानले आहेत.

# मिशन लक्ष्यवेध खाजगी अकादमींचे सक्षमीकरण आर्थिक सहाय्यासाठी प्रस्ताव सादर करणे बाबत

बीड, (प्रतिनिधी) : - महाराष्ट्र राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी व प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे राज्यातील खेळाडूंनी आलिंम्पिक सारख्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पधेत पदके संपादित करण्याकरिता नियोजनबद्ध प्रयत्न होणे गरजेचे आहे राज्यातील खेळाडूंसाठी अद्यावत क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा, क्रीडा विषयक पायाभूत सुविधा, क्रीडा वैद्यकशास्त्र, क्रीडा स्पर्धांचे आयोजन, खेळाडूंना पुरस्कार व प्रोत्साहन, खेळाडूंकरिता करीअर मार्गदर्शन व खेळाडूंच्या क्षमता विकासाठी देशी / विदेशी प्रशिक्षक व संस्थांचा सहयोग हे सर्व घटक विकसित करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने मिशन लक्ष्यवेध या महत्त्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्याच्या निर्णय घेतलेला आहे मिशन लक्ष्यवेध अंतर्गत निवडण्यात आलेल्या थलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सिंग, हॉकी आणि लॉन टेनिस, रोइंग, शुटींग, सेलींग, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, कुस्ती या १२ क्रीडा प्रकारांच्या राज्यातील उत्तम खेळाडू निर्माण करणा या खाजगी अकादमींना आर्थिक सहाय्य देऊन अशा संस्थांचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे. मिशन लक्ष्यवेध अंतर्गत खाजगी आकदमींना आर्थिक सहाय्य करावयाच्या दृष्टीने संबंधित अकादमी मधील खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, सहाय्यक प्रशिक्षक, प्रशिक्षणासाठी उपलब्ध पायाभुत सुविधा व त्यांचा स्तर, क्रीडा साहित्य व क्रीडा अकादमीच्या कामगिरींचे गुणांकन करण्यात येऊन, ३५ ते ५० गुण प्राप्त करणा-या संस्था क वर्ग, ५१ ते ७५ गुण प्राप्त करणा-या संस्था ब वर्ग व ७६ ते १०० गुण प्राप्त करणा-या संस्था अ वर्ग अश्या प्रकारे वर्गीकरण करण्यात येणार आहे. क वर्ग अकादमींना वार्षिक रू १०.०० लक्ष, ब वर्ग अकादमींना वार्षिक रू २०.०० लक्ष व अ वर्ग अकादमींना वार्षिक रूपये ३०.०० लक्ष आर्थिक सहाय्य , पायाभूत क्रीडा सुविधा उभारणी, क्रीडा सुविधा उन्नत करणे, प्रशिक्षक मानधन, क्रीडा व प्रशिक्षण उपकरणे इ बाबींवर खर्च करण्यासाठी देण्यात येणार आहे. त्यानुसार इच्छुक संस्थांनी अधिक माहिती व अर्जाचे नमुन्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे संपर्क साधवा व सदर योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन सुधीर मोरे, सह-संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड अरविंद विद्यागर यांनी केलेले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार ६ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# माझ्या मतदारसंघासाठी मी सक्षम आहे मला कुणाचेही फुकटचे गिफ्ट नको -आ.सुरेश धस

मतदार संघातील शिरूर कासार तालुक्यातील ब्रह्मनाथ येळंब आणि निमगाव मायंबा येथील कोल्हापूर बंधारे यांचे रूपांतरण मध्ये करण्याचा निर्णय कॅबिनेट पर्यंत आणण्याचे काम आम्ही केले आहे या कामासाठी मी २०१४ पासून प्रयत्न करत असून त्यानंतर २०२२, २०२३,२०२४, या कालावधीमध्ये देखील पाठपुरावा केल्यामुळे हा विषय कॅबिनेट मध्ये आला आणि कॅबिनेट मंत्री असल्यामुळे नामदार पंकजाताईंनी हा विषय पाहिला आणि वर्तमानपत्रात आष्टी मतदार संघाला गिफ्ट अशी बातमी छापून आणली केवळ श्रेय घेण्यात साठीच पंकजाताई मुंडे यांनी या गिफ्ट बाबत घोषणा केली आहे वास्तविक पाहता आष्टी मतदारसंघाला कोणत्याही फुकटच्या गिफ्टची आवश्यकता वाटत नाही आम्ही मतदारसंघाच्या विकास कामासाठी सक्षम आहोत या दोन बॅरेजच्या कामाबरोबरच आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघामध्ये आणखीही काही बॅरेजेस मंजूर होणार आहेत त्यासाठी देखील आम्ही प्रयत्न करत आहोत दोन बॅरेज सारख्या कामाचे श्रेय घेणे योग्य नाही अशी परखड प्रतिक्रिया आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केली आष्टी येथील विशेष पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. आमदार सुरेश धस पुढे म्हणाले कॅबिनेट मीटिंगमध्ये आलेला प्रस्ताव पाहून तुम्ही याचा फायदा घेतलेला आहे या बॅरेजेस च्या रूपांतरणाची श्रेय आमच्या पाठपुराव्यालाच आहे याची माहिती मतदारसंघातील जनतेला आहे या कामासाठी मी सन-२०१४ पासून प्रयत्न करत असून,यासाठी पहिल्या पासुन पाठपुरावा मी स्वतःकेला आहे. याबाबत दिलेल्या पत्रांचे पुरावे माझ्याकडे आहेत पुरावेही माझ्याकड आहेत. वास्तविक पाहता पंकजाताई यांनी गिफ्ट द्यायचे होते तर आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यामधील मोठ्या प्रमाणावर



असलेल्या पशुधन आणि दूध उत्पादन मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे पशुवैद्यकीय पशुसंवर्धन महाविद्यालय यांचे गिफ्ट आष्टी मतदार संघाला देणे योग्य होते परंतु आपण त्या विभागाच्या मंत्री झाल्यामुळे आपण ही महाविद्यालय परळी मतदारसंघात घेऊन गेलात परंतु परळी मध्ये किती दूध उत्पादन आहे आणि किती पशुधन आहे याची तुलना करावी आष्टी मतदार संघाला कोणतेही फुकटचे गिफ्ट नको.पंकजाताई यांनी कुठलाही पाठ पुरावा न करता केलेल्या कामांचे गिफ्ट आमच्या मतदारसंघाला देऊ नये.असा खरपुस समाचार आमदार सुरेश धस यांनी ना.पंकजा मुंडे यांचा नाव न घेता घेतला आहे. पुढे बोलतांना ते म्हणाले,माझ्या मतदार संघातील शिरूर (कासार) तालुक्यातील ब्रम्हनाथ येळंव व निमगाव ता.शिरूर (का) जि.बीड या को.प.बंधा-यांचे बॅरेज मध्ये रुपांतरण करण्याचे कामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी,जलसंपदा विभागामार्फत कार्यवाही प्रगतीत आहे.सदर कामाच्या प्रस्तावास राज्य तांत्रिक सल्लागार समिती-१. नाशिक यांनी दि. ०५/०७/२०२४ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिलेली असून प्रस्ताव शासनास निर्णयार्थ सादर आहे.सदर प्रस्तावास मंत्रीमंडळ बैठकीमध्ये मंजुरी आवश्यक आहे.ब्रम्हनाथ येळंब व निमगाव(मायंबा) ता.शिरूर (का) जि. बीड या को.प.बंधा-यांचे बॅरेज मध्ये रुपांतरण करण्याचे काम या प्रस्तावास आगामी मंत्रीमंडळ बैठकीमध्ये हे पत्र मी १३/ १२/२०२४ रोजीच दिले होते.यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ह्या कामाचे कॅबिनेटमध्ये प्रस्ताव घेतल्याचे आपल्या जिल्ह्यातील कॅबिनेट मंत्रीमहोदय यांना समजताच या कामाचे श्रेय घेऊन आष्टी मतदारसंघाला आम्ही केलेले कामे दाखवून आम्हाला गिफ्ट देऊन नये असा खरपूस समाचार आ.सुरेश धस यांनी पंकजा मुंडे यांचा नाव न घेता घेतला आहे.

# प्रत्येक पोलीस स्टेशन येथे सायबर डेस्क ची स्थापना

बीड : जगभरात इंटरनेट आणि डिजीटल सेवांच्या उपभोग घेत असतांना अनेक वेळा नागरिक सायबर फसवणुकीला बळी पडतात. सायबर गुन्हयांमध्ये ओळख चोरी, आर्थिक फसवणुक, हॅकिंग, सायबर स्टॉकिंग आणि हनीकारक सॉप्टवेअर, मोबाईल चोरी इत्यांदींना नागरिक बळी पडतात. जसजसे लोक त्यांचे ऑनलाईन आर्थिक व्यवहार सामाजिक संवाद आणि व्यवसायीक क्रियाकलाप ऑनलाईन करत आहेत. तसे सायबर गुन्हेगार त्यांचा गैरफायदा घेण्याच्या शक्यता वाढत चालल्या आहेत जिल्हयातील नागरिकांना सायबर फसवणुकी पासुन जागृत करणे व फसवणुक झाल्यास अथवा मोबाईल चोरी झाल्यावर त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे. नागरिकांची गैरसोय होऊ नये जवळच्या




पोलीस स्ट ेशनला सदरबाबत मार्गदर्शन मिळावे व मोबाईल गहाळ । चोरीस आळा बसावा याउद्देशाने मा. पोलीस अधिक्षक श्री नवनीत कॉवत यांच्या संकल्पनेतुन प्रत्येक पोलीस स्टेशन स्तरावर ऊूलशी ऊ्शीज्ञ ची स्थापना करण्यात आली आहे. प्रत्येक पोलीस स्टेशनला एक अधिकारी वा दोन अंमलदार यांची ऊूलशी ऊ्शीज्ञ टोमची स्थापन करुन त्यांना प्रशिक्षीत करणे सुरु आहे. तरी नागरीकांना सायबर फ्रॉड झाला किंवा मोबाईल हरवला तर घाबरून न जाता जावळच्या पोलीस स्टेशनला संपर्क साधावा ऊूलशी ऊ्शीज्ञ टीम आपल्याला योग्य मदत करेल असे आवाहन पोलीस अधिक्षक श्री नवनीत कॉंवत यांचेतर्फ नागरिकांना करण्यात येत आहे.

# भावकीचा वाद विकोपाला

पैठण तालुक्यातील लिंबगाव येथील ६५ वर्षीय शेतकरी बाबुराव भानुदास भिसे यांनी भावकीतील जमिनीच्या वादातून होणाऱ्या त्रासाला शुक्रवारी सकाळी सहाच्या सुमारास स्वतःच्या शेतात विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. ही घटना शेत गट क्रमांक ४९ मध्ये घडली. बाबुराव भिसे कंटाळून बाबुराव भिसे यांचा मुलगा बंडू भिसे यांनी पाचोड पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, दोन एप्रिल रोजी दुपारी साडेबारा वाजता बाबुराव भिसे हे पाचोड येथील सहकारी बँकेतून परत येत असताना बसस्थानकावर त्यांना भावकीतील जगन्नाथ भिसे यांनी दारूच्या नशेत शिवीगाळ केली. हातातील काठी हिसकावून मारहाण केली. जिवे न मारण्याची धमकी दिली.या प्रकरणी तीन एप्रिल रोजी न पाचोड पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर बाबुराव भिसे आणि त्यांचा बाबूराव शेतात रस्त्याच्या कडेला पडल्याचे कळवले या धमकीनंतर त्यांनी तहसील कार्यालयात शेतीच्या रस्त्याबाबत अर्ज दिला. त्यानंतर चार एप्रिल रोजी सकाळी चार वाजता बाबुराव भिसे व्यायामासाठी शेतात गेले. पाच वाजता फोन केला असता ते बाहेर असल्याचे सांगितले. सहा वाजता गावातील अनिल पडुळे यांनी वाल्मिक भिसे यांना फोन करून सांगितले की, बाबुराव भिसे शेतातील रस्त्याच्या कडेला पडले आहेत. तोंडातून फेस येत आहे.मुलगा बंडू भिसे यांनी पैठण कोर्टात फौजदारी तक्रार दाखल करण्यासाठी अर्ज केला. तेव्हा जगन्नाथ भिसे आणि साईनाथ भिसे यांनी कोर्टासमोर धमकी दिली. सुभाष भिसे आणि मनोहर भिसे यांचे हातपाय तोडले तसेच तुमचेही तोडू, अशी धमकी दिली. वाल्मिक भिसे यांनी ही माहिती बंडू भिसे यांना दिली. त्यानंतर अंकुश भिसे, गणेश भिसे, दादासाहेब भिसे आणि गावकरी घटनास्थळी पोहोचले. बाबुराव भिसे शेतात बेशुद्ध अवस्थेत आढळले.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती पाली अध्यक्षपदी महेंद्र वीर



मौजे-पाली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ वी सार्वजनिक जयंती उत्सव आयोजनासाठी नालंदाबौद्ध विहार पाली येथे बैठकीचे आयोजन करण्यात येऊन सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी सर्वानुमते महेंद्र रघुनाथ वीर, उपाध्यक्ष अनिकेत बाळू वीर, सचिवपदी प्रशांत जालिंदर गायकवाड,सहसचिव आदेश अशोक वीर,संघटक आत्माराम वाघमारे, सहसंघटक आदित्य धोंडीराम वीर,तर सदस्य म्हणून ऋतिक वीर, रोहित गायकवाड, विजय वीर ,अजय संजय वीर, संदीप गरुड ,राजेश वाकळे, निखिल वाघमारे ,रोहित सोनवणे, विजय वीर,यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यानिमित्ताने दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी सात वाजता महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन तसेच सायंकाळी ७ वाजता भिमशहीर मेघानंद जाधव यांचा भीम गीत गायनाचा दणदणीत कार्यक्रम होईल. तसेच २८ एप्रिल रोजी रात्री ६ वा. गावातील मुख्य रस्त्यावरून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे भव्य मिरवणूक निघणार आहे. असे या बैठकीत नियोजन करण्यात आले.या

# संत भगवान बाबांच्या शिकवणीमुळेच समाज आज स्वाभिमानाने प्रगती करतोय- ना. पंकजाताई मुंडे

बीड । प्रतिनिधी एकर विका, पण शिक्षण शिका ही शिकवण राष्ट्रसंत भगवान बाबांनी दिली. या शिकवणीमुळेच समाज आज प्रत्येक क्षेत्रात पुढे जात आहे. आपण ऊस तोडणारे आहोत, कष्टाळू आहोत पण स्वाभिमानाने जगणारे आहोत. आजच्या तरूण पिढीने चुकीच्या गोष्टींच्या आहारी न जाता स्वतः ची प्रगती साधावी असा मोलाचा संदेश राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे दिला. महाराष्ट्र शासन पर्यटन



संचलनालय मार्फत प्राप्त झालेल्या निधीतून झालेल्या कामाचे लोकार्पण आणि नवीन कामांचे भूमिपूजन ना. पंकजाताई मु ंडे यांच्या मोठया उत्साहात संपन्न झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. प्रतिष्ठानचे डॉ. प्रभाकर धायतडक, आर टी गर्जे, डॉ. अमोल लहाने, डॉ शिवाजी सानप, शिवरूद्रानंद महाराज, योगेश क्षीरसागर, भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. प्रारंभी प्रतिष्ठानच्या वतीने विकास कामांना निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल ना. पंकजाताई मु ंडे यांचा सत्कार करून आभार मानण्यात आले. यावेळी त्यांच्या हस्ते विकास कामांच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. पुढे बोलतांना पंकजाताई म्हणाल्या, संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन करताना अतिशय आनंद होत आहे. संत भगवान बाबांना अभिप्रेत असलेला प्रगत, शिक्षित व स्वाभिमानी समाज घडविण्यात काहीतरी योगदान देता येत आहे याचे समाधान आहे. स्वर्गीय मु ंडे साहेबांनंतर तुम्ही सर्व लोकांनीच मला मायेचे पांघरून घातले. खंबीर पाठीशी उभे राहून मला शक्ती दिली. त्यामुळे मीही प्रामाणिकपणाने जे जे शक्य असेल तिथे सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम करत मार्गक्रमण करत आहे. कधीही स्वाभिमान सोडला नाही. ऊसतोड कामगार घटकाच्या न्याय हक्कासाठी सदैव प्रयत्नशील राहून त्यांच्या जीवनात उन्नती आणण्याचा आपला प्रयत्न आहे. कष्ट, मेहनतीची तयारी आणि स्वाभिमान या त्रिसूत्री वरच आपला समाज सर्वच क्षेत्रांमध्ये प्रगती साधत आहे. संस्कारक्षम पिढी घडविण्याचे कार्य भगवान बाबा प्रतिष्ठानच्या माध्यमातून झाले पाहिजे. भगवान बाबांच्या नावाने असलेल्या या प्रतिष्ठानच्या विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन करण्याचे भाग्य मला लाभल्याचेही पंकजाताई मु ंडे यांनी यावेळी सांगितले

# प्रकाशदादा होत नसेल तर घरी बसाकी मतदारसंघात आज पण लोकं पाण्यासाठी आंदोलन करतायत

## तीन पिढ्यांपासून राजकारण करीत सत्ता भोगणाऱ्या सोळंके घराण्याने केले काय?

माजलगाव मतदार संघ म्हटल की, सगळ्यात अगोदर डोळ्यासमोर येते ते सोळंके घराणे. तीन पिढ्यांपासून मतदारसंघावर सोळंके घराण्याचे वर्चस्व आहे मात्र आजही नागरिकांना पाणी आणि रस्त्यासाठी आंदोलन करावे लागत आहे. ही अत्यंत दुर्दैवाची बाब असून, विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांचे हे अपयशच मानावे लागेल. त्यामुळेच एवढी वर्षे आमदारकी भोगणाऱ्या सोळंके घराण्याने नेमके केले तरी काय ? असा सवाल सामान्य जनतेतून विचारला जाऊ लागला आहे. बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांपैकी माजलगाव विधानसभा हा सदन मतदारसंघ म्हणून ओळखला जातो. या मतदार संघाला सदन जरी म्हणत असले तरी सगळीकडे सारखीच परिस्थिती नाही. मतदार संघामध्ये माजलगाव तालुक्याचा भाग सोडला तर बाकी वडवणी आणि धारूर हे तालुके आजही विविध सोयी सुविधा आणि विशेषता जलसिंचनापासून दूर आहेत. यामुळे मतदार संघामध्ये यांचा समावेश असूनही ही दोन तालुके सदन नाहीत. या दोन तालुक्यांमध्ये अनेक समस्या आजही तशाच आहेत. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने पाणीटंचाईचा अत्यंत अवघड प्रश्न निर्माण झाला असून यासाठी नागरिक मोर्चा काढू लागले आहेत. धारूर तालुक्यातील अंजनडोह तसेच रुई धारूर पाच पिंपळ तांडा या गावातील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर पाण्याच्या साठी घागर मोर्चा काढला. या गावांना उन्हाळ्यात पाणीच मिळत नसल्याने मोठी समस्या निर्माण झाली असून शेती तर सोडाच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. दुसरीकडे पाण्यासोबतच रस्त्याचाही प्रश्न या दोन तालुक्याला भेडसावत आहे. वडवणी ते धारूर रस्त्यासाठी शुक्रवारी सकाळी चिंचवन, पहाडी दहिफळ, पहाडी पारगाव, धूनकवड, चारदरी, कोठरबन, येथीगव्हाणसह इतर गावच्या नागरिकांनी खामगाव -पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गावर थेटेगव्हाण फाट्यावर रास्ता रोको आंदोलन केले. हा रस्ता परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत आवश्यक असून, शेतकरी आणि सगळ्यात नागरिकांना तो आवश्यक आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामस्थांची ही मागणी असून ती पूर्णत्वाला जात नाही. हा सगळा परिसर माजलगाव मतदार संघात येतो. माजलगाव चे आमदार प्रकाश सोळंके यांनी पाण्याचा आणि सदरील रस्त्याचा प्रश्न सोडविण्याचे अनेक वेळा आश्वासन दिले मात्र ते अद्याप पूर्ण झालेले नाही. गेल्या अनेक वर्षांपासून या मतदारसंघावर सोळंके घराण्याचेच वर्चस्व आहे. त्यातली त्यात प्रकाश सोळंके हे त्या ठिकाणी अनेक वेळा आमदार झाले. मात्र एवढ्या काळामध्ये त्यांना हे प्रश्न सोडविता आला नाही. सोळंके घराण्याची तिसरी पिढी राजकारणात उतरत आहे, मात्र तरीसुद्धा त्यांना मतदार संघातील प्रश्न विशेषतः मूलभूत प्रश्न सोडविता आलेले नाही. एखाद्या आमदाराला एखादीच टर्म मिळाली तर त्याला पूर्ण कामे करता येत नाहीत, मात्र प्रकाश सोळंके आणि सोळंके घराण्याला मतदार संघातील जनतेने अनेक वेळा संधी दिलेली आहे. त्यामुळे त्यांच्याकडून मतदार संघातील मूलभूत प्रश्न मार्गी लावायलाच हवेत. आजही नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकावे लागत असेल, यासाठी



जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढावा लागत असेल तर एवढ्या वर्षांमध्ये आमदारांनी केले काय ? असा प्रश्न निर्माण होतो.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com